# विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालय, पुणे विभाग,पुणे

१७,डॉ.आंबेडकर मार्ग,लाल देवळासमोर, पुणे-४११ ००१.

दुरध्वनी क्र.-०२०-२६१२५६९६/२६१२२२१७ फॅक्सनं.- ०२०- २६१२२२१७

ई मेल आय डीक्र.dydpune @ gmail.com वेब साईट- www.dydepune .com

जाक्र./शिउसं/पुवि/उमाशि-१/सांकेतांक/२०१७/ ७४९५ दिनांक- 12 OCT 2017

प्रति,
शिक्षणाधिकारी(माध्यमिक),
जिल्हा परीषद पुणे /अहमदनगर /सोलापूर .

**विषय :- उच्च माध्यमिक शिक्षकांचे वरिष्ठ वेतनश्रेणी व निवडश्रेणी सेवान्तर्गत प्रशिक्षण मे/जून २०१८ साठी online माहिती मागविण्याबाबत.**

संदर्भ:-महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,पुणे-४ यांचे पत्र
दिनांक-०३.१०.२०१७.

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये आपणास कळविण्यात येते की, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षकांसाठी वरिष्ठ वेतनश्रेणी व निवडश्रेणी सेवान्तर्गत प्रशिक्षण मे/जून २०१८ मध्ये आयोजित करावयाचे आहे. सदर प्रशिक्षणाकरिता ऑनलाईन माहिती दि.३० नोव्हेंबर २०१७पर्यंत मागविण्यात येत आहेत. याबाबतच्या प्रकटनाची प्रत सोबत जोडलेली आहे.

तरी सदर प्रकटनास आपल्या स्तरावरून सर्व कनिष्ठ महाविद्यालयास सर्वांच्या निदर्शनास आणून दयावे व कोणतेही उच्च माध्यमिक शिक्षक प्रशिक्षणापासून वंचित राहणार नाही याची काळजी घ्यावी.

MRaut
10.10.17
(मिनाक्षी राऊत)
सहा. शिक्षण संचालक
शिक्षण उपसंचालक कार्यालय,
पुणे विभाग, पुणे.

# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,पुणे

सर्व्हे क्र.८३२ अ, फायनल प्लॉट क्र.१७८/१७९, बी.एम.सी.सी.रोड,
बालचित्रवाणी शेजारी, भांबुर्डा, शिवाजीनगर, पुणे ४११ ००४


## -: निवेदन :-

**उच्च माध्यमिक शिक्षकांसाठी "वरिष्ठ वेतनश्रेणी" व "निवडश्रेणी" सेवांतर्गत प्रशिक्षण-२०१८**

उच्च माध्यमिक शिक्षकांसाठी सेवान्तर्गत प्रशिक्षण माहे **मे/जून २०१८ मध्ये** विभागीय मंडळनिहाय आयोजित करावयाचे आहे. प्रशिक्षणासाठी अर्हताकारी सेवा पूर्ण झालेल्या शिक्षकांनी वरिष्ठ वेतनश्रेणी / निवडश्रेणी प्रशिक्षण घेण्याकरिता Online अर्ज सादर करावयाचे आहेत. मंडळाच्या **http://traning.mh-hsc.ac.in या वेबलींकवर दि.३०/११/२०१७ पर्यंत** प्रशिक्षणनिहाय वेगवेगळे / स्वतंत्र Online फॉर्म/अर्ज भरण्याची सुविधा उपलब्ध केलेली आहे.

शिक्षकांनी प्रशिक्षणासाठी Online भरलेल्या अर्जाची प्रिन्ट घेऊन आपल्या शाळा/कनिष्ठ महाविद्यालयाच्या मुख्याध्यापक/प्राचार्यांमार्फत संबंधित जिल्ह्याच्या शिक्षणाधिकारी (माध्य.)/ विभागीय शिक्षणउपसंचालक या कार्यालयांकडे तातडीने पाठविण्याची व्यवस्था करावी.

**"वरिष्ठ वेतनश्रेणी" व "निवडश्रेणी" प्रशिक्षणासाठी विहित पध्दतीने संबंधित कार्यालयाकडे अर्जाची प्रिंट सादर केलेल्या शिक्षकांची शैक्षणिक व व्यवसायिक अर्हता तपासून-पडताळणी करुन प्रशिक्षणासाठी पात्रतेच्या शिफारशीसह ज्या शिक्षकांची नावे मंडळाकडे प्राप्त होतील अशाच शिक्षकांना प्रशिक्षणात सामावून घेण्यात येईल.** दिलेल्या मुदतीनंतर आलेल्या अर्जांचा विचार केला जाणार नाही.

| अ.क्र. | प्रशिक्षण | अर्हता |
|---|---|---|
| १ | वरिष्ठ वेतनश्रेणी | १) माहे मे २०१८ पर्यंत **१२ वर्षे पूर्ण** व त्याहून अधिक सेवा झालेले व विहित शैक्षणिक, व्यावसायिक पात्रता पूर्ण करणारे **कार्यरत** शिक्षक. *( ११ वर्षे व १० वर्षे सेवा झालेल्या शिक्षकांनी सुध्दा नाव नोंदणी करण्यास हरकत नाही.)* |
| २ | निवडश्रेणी | १) माहे मे २०१८ पर्यंत **२४ वर्षे पूर्ण** व त्याहून अधिक सेवा झालेले व विहित शैक्षणिक, व्यावसायिक पात्रता पूर्ण करणारे **कार्यरत** शिक्षक. २) एम.एड. अथवा एम.फील. अथवा पी.एच.डी. अथवा एम.एस.ए.सी.आय.टी (MSACIT) *( २३ वर्षे व २२ वर्षे सेवा झालेल्या शिक्षकांनी सुध्दा नाव नोंदणी करण्यास हरकत नाही.)* |

**टिप:-** *प्रशिक्षणासाठी शिफारशीसह प्राप्त झालेल्या शिक्षकांच्या नावांनुसार प्रशिक्षणाची केंद्रे निश्चित करताना आवश्यकतेनुसार क्रमश: १२, ११, १० व २४, २३, २२ वर्षे सेवा झालेल्या शिक्षकांचा प्रशिक्षणासाठी विचार केला जाईल. अशा शिक्षकांना प्रशिक्षणात सामाऊन घेणे अथवा न घेणे हा निर्णय सर्वस्वी मंडळाचा राहील. त्याबाबत कोणासही आग्रह धरता येणार नाही, याची नोंद घ्यावी.*

**दिनांक:** ०६/०९/२०१७ ०३/१०/२०१७
**राज्य मंडळ, पुणे-०४.**

**(कृष्णकुमार पाटील)**
**सचिव**
**राज्य मंडळ, पुणे.**